| | | | |
|---|---|---|---|
| MHNS140000572022 | दाखल दिनांक | :- | ०६/०१/२०२२ |
| | नोंदणी दिनांक | :- | ०६/०१/२०२२ |
| | निकाल दिनांक | :- | १०/०३/२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस |
| | | | ०४ ०२ ०४ |

**दिंडोरी येथील न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांचे न्यायालयात,**

**( पिठासीन अधिकारी श्रीमती एस. सी. निर्मळे)**

**न्यायनिर्णय घोषीत दिनांक – १० मार्च, २०२६**

**( नियमित फौजदारी खटला क्र.११/२०२२, नि.क्र.३२)**

गुन्हा नोंद क्र.१००/२०२०, दिंडोरी पोलीस ठाणे.

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>दिंडोरी पोलीस ठाणे, |
| अभियोग पक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर.बी.वळवी. |
| आरोपी | १. | मंगेश बाळासाहेब वाघ,<br>वय - ३५ वर्ष, |
| | २. | श्रध्दा मंगेश वाघ,<br>वय - ३२ वर्ष, |
| | ३. | शकुंतला बाळासाहेब वाघ,<br>वय - ६० वर्ष, |
| | **४.** | **बाळासाहेब लक्ष्मण वाघ (मयत)** |
| | ५. | मिना बाळासाहेब वाघ,<br>वय - २५ वर्ष,<br>आरोपी क्र.१ ते ३ व ५ रा. आंबेदिंडोरी शिवार,<br>ता. दिंडोरी, जि. नाशिक. |
| आरोपीं तर्फे विधीज्ञ | | विधीज्ञ श्री. पी. एस. भालेराव |

**भाग-ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | १०/०५/२०२० |
| गुन्हा दाखल दिनांक | :- | १३/०५/२०२० |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | :- | ०६/०१/२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | १३/१०/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | १३/११/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १०/०३/२०२६ |
| शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक असल्यास | :- | निरंक. आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | दोषारोप कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मंगेश बाळासाहेब वाघ | १८/०५/२०२० | १८/०५/२०२० | भा.द.वि. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | श्रध्दा मंगेश वाघ | | | | | | |
| ३. | शकुंतला बाळासाहेब वाघ | | | | | | |
| ४. | **बाळासाहेब लक्ष्मण वाघ (मयत)** | | | | | | |
| ५. | मिना बाळासाहेब वाघ | | | | | | |

**भाग-क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/आरोपी पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | चंद्रकांत ज्ञानदेव वाघ | पंच | पी.डब्ल्यु.१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | ज्ञानेश्वर पुंडलिक वाघ | पंच | पी.डब्ल्यु.२ |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| **सा.क्रं.** | **साक्षीदाराचे नांव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

**क.न्यायालयीन साक्षीदार**

| **सा.क्रं.** | **साक्षीदाराचे नांव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष/आरोपी /न्यायालयीन पुराव्यांची यादी**

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ब. आरोपीतर्फे पुरावा**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन पुरावा**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| **अ.क्रं.** | **मुद्देमाल क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

**(दिनांक १०/०३/२०२६ रोजी घोषित केले)**

अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणे –

दिनांक १०/०५/२०२० रोजी १५.०० ते १५.३० वाजेच्या सुमारास मौजे

आंबे दिंडोरी शिवारात, रस्त्यावर, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे फिर्यादी शिवाजी धोंडीराम वाघ हे त्यांचे भाऊ हिरामण धोंडीराम वाघ यांस बघण्यासाठी त्याचे घराजवळ गेले असता तेथे त्यांचा नातु तेजस आंबादास वाघ व मंगेश बाळासाहेब वाघ यांच्यात वाद चालु होते तेव्हा फिर्यानीने त्यांना भांडण का करता असे विचारले असता त्यावेळी त्याची बाजू घेऊन आरोपी क्र.२, ३ व ५ हे धाऊन आले व आरोपी क्र.१ ने त्याचे हातातील बांबुची काठीने फिर्यादीचे डोक्यावर व हातापायावर मारहाण केली. तसेच आरोपी क्र.२ हिने देखील तिच्या हातातील जंगली काठीने फिर्यादीस मारहाण केली. तसेच इतर सर्व आरोपींनी फिर्यादीस व त्यांचा नातु यास शिवीगाळ करुन हाताचापटीने मारहाण करुन तुमचा बेतच पाहतो अशी दमदाटी केली. डलेल्या प्रकारावरुन फिर्यादीने आरोपींविरुध्द दिंडोरी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली.

**०२.** सदर फिर्यादीवरुन दिंडोरी पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये आरोपींविरुध्द गुन्हा रजिस्टर नं.१००/२०२० दाखल झाला. सदर गुन्हयाचा तपास श्री. डी. एल. पगार, पोलीस हवालदार ब.नं.३१३ यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला. तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदवले, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळविले व त्यानंतर आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०३.** प्रकरण प्रलंबित असतांना आरोपी क्र.४ मयत झाल्याने त्याचेविरुध्द प्रकरण अबेट करण्यात आले. दोषारोपातील मजकुर व दाखल कागदपत्र पाहून आरोपी क्र.१ ते ३ व ५ विरुध्द निशाणी क्र. २५ वर दोषारोप ठेवला. सदर दोषारोप आरोपींना त्यांच्या भाषेमध्ये वाचून दाखवला असता त्यांनी तो नाकबूल केला. आरोपींविरूध्द कोणताही सबळ पुरावा पटलावर न आल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणेचे जबाब नोंदवण्यात आले नाहीत.

**०४.** अभियोगपक्ष व आरोपींतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. त्यानंतर

अभिलेखाचे अवलोकन केले. त्यानुसार खालील मुद्दे माझे निष्कर्षाकामी निर्माण झाले. सदरचे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे शाबित करतो का की, दिनांक १०/०५/२०२० रोजी १५.०० ते १५.३० वाजेच्या सुमारास मौजे आंबे दिंडोरी शिवारात, रस्त्यावर, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे तुम्ही बेकायदेशिर जमाव केला, अपराध करण्याचे समान उद्दीष्टे साध्य करण्यासाठी एकत्रीत आले व त्याद्वारे भारतीय दंड विधानचे कलम १४३ खाली शिक्षापात्र असलेला अपराध केलेला आहे ? | **सिध्द केले नाही** |
| २. | अभियोग पक्ष हे शाबित करतो का की, वरील नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपी बेकायदेशीर जमावाचे घटक होते व जमावाचे समान उद्दीष्टे साधण्यासाठी दंगा केला आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानचे कलम १४७ खाली शिक्षापात्र असलेला अपराध केलेला आहे ? | **सिध्द केले नाही** |
| ३ | अभियोग पक्ष हे शाबित करतो का की, वरील नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपी बेकायदेशीर जमावाचे घटक होते व जमावाचे समान उद्दीष्ट साधण्यासाठी लाकडी काठी हे हत्यार म्हणुन वापरुन मृत्युस कारण होणे संभवणीय आहे अशा वस्तुनिशी सज्ज होवून दंगा केला आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानचे कलम १४८ खाली शिक्षापात्र असलेला अपराध केलेला आहे ? | **सिध्द केले नाही** |
| ४. | अभियोग पक्ष हे शाबित करतो का की, वरील नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना लाकडी काठी हे हत्यार म्हणुन वापरुन मृत्युस कारण होणे संभवणीय आहे अशी वस्तु काठीने ईच्छापूर्वक दुखापत पोहचविली आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानचे कलम ३२४ सह कलम १४९ खाली शिक्षापात्र असलेला अपराध केलेला आहे ? | **सिध्द केले नाही** |
| ५. | अभियोग पक्ष हे शाबित करतो का की, वरील नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ व २ यांनी त्यांच्या हातातील | **सिध्द केले नाही** |

| | | |
|---|---|---|
| | लाकडी काठीने फिर्यादीचे डोक्यास मारहाण केली व आरोपी क्र.३ ते ५ यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना हाता चापटीने मारहाण करुन किरकोळ दुखापत केली व त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम ३२३ सह कलम १४९ खाली शिक्षापात्र असलेला अपराध केलेला आहे ? | |
| ६. | अभियोग पक्ष हे शाबित करतो का की, वरील नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना वाईट शिवीगाळ केली व प्रक्षोभित करुन शांततेचा भंग करण्याच्या उद्देशाने उद्देशपूर्वक अपमान केला आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानचे कलम ५०४ सह कलम १४९ खाली शिक्षापात्र असलेला अपराध केलेला आहे ? | **सिध्द केले नाही** |
| ७. | अभियोग पक्ष हे शाबित करतो का की, वरील नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना दमदाटी करुन भयभित करण्याच्या प्रयत्न करुन धाकदपटशा केला आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम १४९ खाली शिक्षापात्र असलेला अपराध केलेला आहे ? | **सिध्द केले नाही** |
| ८. | कोणता आदेश ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ७ करिताः-**

**०५.** मुद्दा क्र. १ ते ७ चे विश्लेषण एकसारखे असल्यामुळे व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मी सदर मुद्दयांचे गुणग्रहण एकत्रीतरित्या करीत आहे.

**०६.** आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाला हे सिध्द करणे आवश्यक आहे की, दिनांक १०/०५/२०२० रोजी १५.०० ते १५.३० वाजेच्या सुमारास मौजे आंबे दिंडोरी शिवारात, रस्त्यावर, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे आरोपींनी बेकायदेशिर जमाव केला, अपराध करण्याचे समान उद्दीष्टे साध्य करण्यासाठी एकत्रीत येवुन बेकायदेशीर जमावाचे सभासद होवुन फिर्यादी व त्यांचा नातु तेजस यास हाता-चापटीने

तसेच लाकडी काठीने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत करुन फौजदारीपात्र धमकी दिली.

**०७.** अभियोगपक्षाने आरोपींवरील आरोप सिध्द करण्याकरीता एकुण दोन साक्षीदार तपासले. अभियोग साक्षीदार क्र.१ चंद्रकांत ज्ञानदेव वाघ व अभियोग साक्षीदार क्र.२ ज्ञानेश्वर पुंडलिक वाघ यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, त्यांच्या समक्ष घटना घडली नाही. ते पंचनाम्याच्यावेळी नव्हते. त्यांच्या समक्ष काहीही जप्त केले नाही. त्यांना पंचनामा दाखविण्यात आला असता त्यावर त्यांची सही आहे. ती सही पोलीस स्टेशनला घेतली होती. त्यातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे कथन केले आहे. सदरचे तीन्ही साक्षीदार हे अभियोगपक्षास सहाय्य होईल अशी साक्ष देत नसल्यामुळे अभियोगपक्षाने त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु, त्यात देखील सदर साक्षीदार यांनी अभियोगपक्षास मदत होईल अशी कोणतीही साक्ष दिली नाही. याउलट, त्यांनी पंचनाम्यामधील मजकुर नाकारला आहे.

**०८.** अभियोगपक्षाने एकुण दोन साक्षीदार तपासले. साक्षीदार क्र.१ व २ हे घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच असुन त्यांनी अभियोगपक्षास पुरक अशी साक्ष दिलेली नाही. अभियोगपक्षाने विचारलेल्या सुचक प्रश्नांत देखील सदर साक्षीदारांनी घटनास्थळ पंचनाम्यामधील मजकुर नाकारला आहे. त्यामुळे घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर शाबीत झालेला नाही. अभियोगपक्षाने पुरेशी संधी असुनही तपासिक अंमलदार, फिर्यादी व इतर नेत्र साक्षीदार यांना तपासलेले नाही. सबब, साक्षीदारांच्या साक्षेवरुन आरोपींनीच वर नमुद गुन्हा केलेला आहे हे निसंधेहपणे शाबीत होत नाही. वरील सर्व साक्षीपुरावा व अभिलेखावरील उपलब्ध पुरावा पाहता आरोपींनी सदरचा गुन्हा केला आहे असे निसंदेहपणे शाबीत होत नाही. सबब, वरील विवेचनावरुन मी मुददा क्र. १ ते ७ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.८ करिताः-</u>**

**०९.** मुद्दा क्र.१ ते ७ चे निष्कर्ष विचारात घेता, अभियोगपक्ष आरोपींविरुध्दचे

गुन्हे शाबित करु शकलेले नाही. आरोपींविरुध्द अभिलेखावर कोणताही सबळ पुरावा आलेला नाही. त्यामुळे संशयाचा फायदा आरोपींना मिळतो. सबब, आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र.८ चे उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ मंगेश बाळासाहेब वाघ, आरोपी क्र.२ श्रध्दा मंगेश वाघ, आरोपी क्र.३ शकुंतला बाळासाहेब वाघ व आरोपी क्र.५ मिना बाळासाहेब वाघ यांची भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचा जामीन कदबा रदद् करण्यात येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ (अ) चे अंमलबजावणी अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र दयावे.

४. सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल एक ३ फुट लांबीची लाकडी काठी व एक २.५ फुट लांबीची लाकडी काठी हे मुल्यहिन असल्याने तो अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

(न्याय निर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

सही/-<br>
(एस. सी. निर्मळे)<br>
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>
दिंडोरी.

दिंडोरी<br>
दिनांक १०/०३/२०२६